खोडकर कावळा

इरिना हेल

मराठी : अश्विनी बर्वे



खूप पूर्वी दोन मुलं, कॉन्सटेंटाइन आणि मरीना, आपल्या हिवाळी कीव शहरातून गावाकडे उन्हाळा घालवण्यासाठी आले होते. तिथं बागेत, त्यांना एक कावळ्याचे जखमी पिल्लू सापडले. त्यांनी त्याला पाळायचं ठरवलं आणि त्याला “क्रा-क्रा” नाव दिलं.

एका पाळीव पक्ष्याच्या रुपात क्रा-क्रा खूप मजेदार होता, मुलांना ते लवकरच कळलं. वास्तवात तो एक खूप खोडकर कावळा होता. एक दिवस अभ्यासाच्या वेळी क्रा-क्रा खोलीत उडू लागला आणि मुलांच्या शाळेच्या पुस्तकांवर शाई पसरवली. आणि जेव्हा धुतलेले कपडे दोरीवर वाळत असत तेव्हा क्रा-क्रा सगळ्या कपड्यांच्या पिना काढून टाकत असे. मरीनाच्या वाढदिवसाच्या पार्टीला त्याने आपल्या इतर मित्रांना खिडकीतून आत घेवून आला आणि त्यांनी तिथं ठेवलेलं सगळं रुचकर जेवण खाऊन टाकलं. कॉन्स्टेंटाइन आणि मरीनाला क्रा-क्रा ला जंगलात सोडून द्यायला सांगितले गेले. पण जेव्हा मुलं जंगलात रस्ता हरवले तेव्हा परत क्रा-क्रा नेच त्यांना योग्य रस्ता दाखवला.त्यानंतर क्रा-क्राला परिवारा बरोबर राहायला सांगितले गेले-पण तो सतत खोड्या काढतच राहिला.

क्रा-क्राची मनोरंजक कहाणी खरच एक खरी कहाणी आहे, जी इरिना हेलच्या काकांनी त्यांना सांगितली होती.

खोडकर कावळा



इरिना हेल





एकदा दोन मुलं होती - कॉन्सटेंटाइन नावाचा मुलगा आणि मरीना नावाची एक मुलगी.



ते दूर कीव मध्ये आपल्या आईवडील आणि आपली नोकराणी नियानिया बरोबर राहत होते.

हिवाळा अधिक काळ चालणारा आणि अधिक थंड होता आणि मुलं अधिरतेने बर्फ वितळण्याची वाट बघत होते.त्यामुळे ते शहर सोडून आपल्या गावातल्या घरात जाऊ शकले असते.

नियानियाने त्यांची खेळणी आणि कपडे बरोबर घेतले आणि जेव्हा सगळं काही आवरून झालं, तेव्हा परिवाराने पॅडल स्टीमरने नदीतून प्रवास केला.



तो एक लांबचा प्रवास होता, पण शेवटी ते आपल्या मुक्कामाच्या जागी येवून पोहचले. इवाश्का, घोड़ागाड़ी घेवून त्यांना घरी घेवून जाण्यासाठी गोदीवर वाट बघत उभा होता.





ते गाड़ीत बसले आणि सूर्यफुलाची शेते मागे सोडत धुळीच्या रस्त्याने पुढे गेले.

आपल्या उन्हाळी घराच्या फाटकातून आत शिरताच ,त्यांना स्वयंपाकी अवदोतिया , माळी – ग्रिशा, आणि नोकराणी माशा त्यांचे स्वागत करण्यासाठी पळत येतांना दिसले. .



मुलं त्यांना भेटली आणि सरळ पोटमाळ्यावर सगळं मागच्या वर्षी सारखंच आहे ना हे बघण्यासाठी आपल्या खोलीत गेले.

जेव्हा त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिलं तेव्हा त्यांना बागेतल्या एका झाडाखाली काहीतरी छोटं आणि काळे पडलेलं दिसलं.

“ते काय आहे?” कॉन्स्टेंटाइनने विचारलं.

"चला जावून बघू या." मरीना म्हणाली.



गवतावर खाली, त्यांना कावळ्याचे एक घायाळ पिल्लू सापडले. असं वाटत होतं की जसे ते आपल्या घरट्यातून खाली पडलं आहे.

“बिचारा,” मरीना म्हणाली.

"चला त्याला पाळू या," कॉन्स्टेंटाइन म्हणाला. “आपण त्याला कोणत्या नावाने हाक मारायचं?”

"क्रा-क्रा," कावळ्याने काव-काव केलं.

अशा प्रकारे त्याचं नाव क्रा-क्रा पडलं.



मुलांनी कावळ्याला उचललं. ते नियानियाला दाखवण्यासाठी त्याला घरात घेवून गेले. नियानियाकडे प्रत्येक गोष्टीवर इलाज होता- मुरुमापासून ते वाईट स्वभावापर्यंत, ती काहीही बरं करू शकत असे.

नियानियाने कावळ्याचा जखमी पाय सरळ राहण्यासाठी पायाला लाकडाच्या दोन तुकड्यां मध्ये बांधलं.



ते बघून कॉन्सटेंटाइनने आपल्या पायासाठी सुद्धा लाकडाची पट्टी मागितली आणि तसेच मरीनाने सुद्धा पट्टीची मागणी केली.







क्रा-क्राला मुलांचा फार लळा लागला.तो दिवसभर त्यांच्या मागे मागे करत असे आणि त्यांच्या खेळात सहभागी होत असे.

त्याला अंघोळ करायला आवडे. आणि जेव्हा तो नियानियाला पाण्यात मुठभर भोजपत्राची पाने हलवतांना बघे,तेव्हा तो असा ओरडे की जणू तो सांगतो आहे की त्याला अंघोळ करायची आहे.

एका पाळीव प्राण्याच्या रुपात क्रा-क्रा खूप मज़ेदार होता. पण मुलांना लवकरच कळलं की तो एक खूप खोडकर कावळा होता.

एक दिवस, मुलं आपल्या शिक्षकाबरोबर अंकगणिताचा अभ्यास करत होते, तेव्हा क्रा-क्रा खोलीत उडत आला.

तो मरीनाच्या टेबलवर बसला आणि तिच्या वहीवर शाई पसरवली. मरीनाने ताबडतोब क्रा-क्रा ला बागेत हाकललं.





बागेत माशा धुतलेले कपडे वाळत घालत होती.. क्रा-क्रा उडाला, आणि जसे माशाने दोरीवर कपडे टाकले, तसे क्रा-क्राने कपड्याचे चिमटे काढले. ज्यामुळे खूप कपडे खाली चिखलात पडले.

“त्या कावळ्याला लगेच पिंजऱ्यात बंद करायला पाहिजे,” आई जोरात ओरडली.





म्हणून जेव्हा मुलं गावाच्या जत्रेत फिरायला गेले, तेव्हा क्रा-क्राला घरीच ठेवलं. पण कसं तरी त्याला पिंजऱ्याच्या बाहेर पडण्यात यश मिळालं आणि तो उडाला.

“तिकडे बघा,” कॉन्स्टेंटाइन अचानक ओरडला. “तो क्रा-क्रा च आहे.”



संगीतकारांना हे बघून खूप राग आला की क्रा-क्राने त्यांच्या ढोलकीला चोचीनं छिद्र पाडलं आणि नाचणारे अस्वल मिशा खूप रागात होते कारण या हंगामात कोणीच त्याचा नाच बघत नव्हते. मरीना आणि कॉन्सटेंटाइनला लवकरच घरी पाठवून दिलं गेलं. क्रा-क्रा ने खूप हल्ला-गुल्ला तिथं केला होता.






मग मुलांनी आईची बेडरूम सजवण्याचे -आवरण्याचे ठरवले.

“मी सेंट जॉर्ज आहे,” कॉन्सटेंटाइनने झाडू नाचवत आणि आपल्या कुत्र्याच्या बुरीयाच्या पाठीवर बसत म्हटलं.

“मी राजकुमारी आहे,” मरीना म्हणाली. “आपण ड्रॅगन म्हणून कशाचा उपयोग करायचा?”

"क्रा-क्रा ड्रॅगन होवू शकतो," कॉन्स्टेंटाइन म्हणाला.



क्रा-क्राला ड्रॅगन व्हायचं नव्हतं. एका किंचालीने त्याने बुरीयाला घाबरवलं आणि मग त्याच्या हातात लागणार नाही असा बाहेर उडून गेला. घाबरून कुत्र्याने उडी मारली त्यामुळे कॉन्सटेंटाइन फरशीवर पडला. त्यामुळे आईची पावडर गालिच्यावर सांडली. क्रा-क्राने माळेवर फटकारा मारला आणि मग सरळ खिडकीतून बाहेर उडून गेला.





क्रा-क्रा एका उंच झाडाच्या फांदीवर बसला ज्याची माळ अजूनही चोचीत लटकलेली आहे.



मरीना त्याच्यामागे बागेत पळाली.

“त्वरित खाली ये,खोडकर पक्षी,” तीओरडली. ती झाडावर चढू लागली, पण तिचा पेटिकोट झाडाच्या फांदीत अडकला.

मग सगळे लोक धावपळत आले. ते बघून क्रा-क्रा घाबरला आणि त्याने माळ खाली फेकून दिली.कोणीतरी मरीनाला शिडीवर चढून वाचवलं. क्रा-क्राच्या खोड्यांनी लोक खूप त्रासले होते.



मग काही दिवसानंतर मरीनाचा जन्मदिवस होता. तिच्यासाठी सहलीची योजना आखली गेली आणि तिच्या चुलत भावांना आमंत्रित केलं गेलं. कॉन्सटेंटाइनला हे बघण्यासाठी घरी राहावं लागलं,

क्रा-क्रा त्यादिवशी कोणतीही खोडी करणार नाही.

“हे ठीक नाही आहे,” कॉन्स्टेंटाइनने तक्रार केली.

"क्रा!" कावळा म्हणाला.

“जर त्यादिवशी सहलीच्या जागी खूप पाऊस झाला तर!”

"क्रा-क्रा!" कावळा म्हणाला.

“गाडीचे चाक निघावे,” कॉन्स्टेंटाइन म्हणाला.

"क्रा-क्रा!" कावळ्याने आपल्या डोळ्यात एक खोडकर चमक दाखवत म्हटले.




थोड्यावेळाने सगळं कुटुंब परत आलं. सगळेजण भिजले होते आणि पायी चालत येत होते.

मरीना म्हणाली, “तू कधी विचार सुद्धा करू शकणार नाही काय झालं असेल ते. खूप जोरात पाउस आला आणि आमची गाडी चिखलात फसली आणि तिचे एक चाक निघून आले. त्यामुळे आम्ही सगळेजण खूप वैतागलो.”

“आणि त्यासाठी आम्ही तुमच्या कावळ्याला दोष देवू शकत नाही,”वडील मजेत म्हणाले. “बरं ठीक आहे, त्याचं वागणं कसं होतं?”

“खूप चांगलं!” कॉन्स्टेंटाइन म्हणाला.






कॉन्स्टेंटाइनने ही गोष्ट काहीशी लवकरच सांगितली. जेव्हा वाढदिवसाच्या पंगती साठी सगळेजण भोजन गृहात आले, तेव्हा त्यांनी पाहिलं की क्रा-क्रा आणि त्याचे दोस्त आधीच आत आले आहेत.

त्यांना पण पार्टीत सामील व्हायचं आहे.




“हे तर अति पेक्षा जास्त झालं आहे,” वडील गर्जना करत म्हणाले. “आता त्या कावळ्याला जावंच लागेल.”

हे ऐकून मुलं खूप रडली. पण आईवडील आपल्या निर्णया वर दृढ होते. आता क्रा-क्रा त्यांच्या घरात राहणार नाही.





दुसऱ्या दिवशी मुलांनी क्रा-क्रा ला एका टोपलीत ठेवले आणि इवाश्का त्यांना दूरच्या जंगलात एका लांबच्या रस्त्याने घेवून गेला, जिथं त्यांना क्रा-क्रा ला सोडून द्यायचं होतं.





जेव्हा मुलं गाडीत चढले तेव्हा ते खूप दुःखी होते. लवकरच त्यांनी पाहिलं की कावळा आपल्या नव्या दुनियेत, झाडाच्या हिरव्या पानांत गायब झाला.

“तो आपल्या शिवाय कसा जगेल?” मरीनाने उत्सुकतेने विचारलं.

ते जंगलाच्या रस्त्याने परत येत होते तेव्हा इवाशका गव्हाची कापणी करणाऱ्या काही शेतकऱ्यांशी बोलू लागला.

अचानक आकाशात कावळ्यांनी झेप घेतली आणि मग फटका मारत ते झाडाकडे निघून गेले.

"ज़रा, बघा!" कॉन्स्टेंटाइन रडत म्हणाला, “कदाचित ते क्रा-क्रा ला जखमी करतील.”





मुलं जंगलात परत पळत गेले, पण तिथं क्रा-क्राचा काही खुणा नव्हत्या. त्यांच्या चारी बाजूला उंच-उंच काळे वृक्ष उभे होते आणि त्यांच्या पानांनी भरलेल्या फांद्या हवेत हलत होत्या.


"इवाश्का! इवाश्का!" ते ओरडले परंतु त्यांचे शब्द जोरात येणाऱ्या हवेत उडून कुठेतरी हरवले.

मग, झाडांमधून कोणत्याही हवेपेक्षा जोरात एक कर्कश आवाज आला. मुलांनी घाबरून एक-दुसऱ्याचा हात पकडला.तेव्हा त्यांना झाडामधून घुर्रघुर्र आवाज आला.

ते एक अस्वल होते.







... एका साखळीला बांधलेलं अस्वल मिशा, आपल्या रक्षका बरोबर उभं होतं.


“मुलांनो, तुम्ही जंगला मध्ये काय करत आहात?” अस्वलाच्या रखवालदाराने विचारले.

“आम्ही आमचा कावळा हरवला आहे! आणि आता आम्ही आमच्या घराचा रस्ताही विसरलो आहोत,” मरीना म्हणाली.

मग रखवालदाराने त्यांना एक चमकदार काळा पंख दाखवला. “मला या रस्त्यावर मिळाला,” त्याने आपल्या मागे इशारा करत सांगितले.

मुलं झाडांच्या मधून फिरत चालत राहिले, आणि शेवटी ते जंगलाच्या बाहेर आले.

तिथून काही अंतरावर त्यांचं घर होतं.



पण तिथं ओट्यावर कोण होतं? तो क्रा-क्रा असू शकतो का?! तो पुढे उडत येवून त्यांची वाट बघत होता का?




सगळं घर पायऱ्या उतरून खाली आलं.

"आम्ही लोक खूप चिंतेत होतो," सगळे म्हणाले.

"जेव्हा इवाश्का तुमच्या शिवाय परत आला, तेव्हा आम्हांला वाटले की तुम्हांला जंगली लांडग्याने खाऊन टाकलं असेल."


तेव्हा अस्वलाच्या रखवालदाराने आपली ओळख करून दिली आणि सांगितलं की कसे त्याने मुलांना जंगलात हरवलेलं पाहिलं होतं.



"वास्तवात आम्हांला कोणी घराचा रस्ता दाखवला असेल तर तो क्रा-क्रा होता, मरीना म्हणाली. "त्याने आमच्यासाठी एक खुण सोडली होती आपला पंख. कृपया त्याला क्षमा करा आणि त्याला आमच्या बरोबर राहू द्या."


आईने वडिलांकडे बघितलं आणि वडिलांनी आपली मान हलवली.

"आपण क्रा-क्राला एक संधी देवू," ते म्हणाले.





ते सगळे चहा प्यायला बसले आणि मुलांनी आपल्या साहसाबद्दल परत सांगितले. अचानक वडिलांनी आपल्या चेहऱ्यावर हात ठेवला.



“ही फार मजेदार गोष्ट आहे,” ते म्हणाले. “मी शपथपूर्वक सांगू शकतो की मी आपला चष्मा घातला होता.पण आता तो गायब झाला आहे. तो कुठे असू शकतो? क्रा-क्रा? क्रा-क्रा...!"

अंत